(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि जाती निर्मूलन

**दादाराव कांबळे,** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

---

**प्रस्तावना :**

छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे राजे नसून संपूर्ण महाराष्ट्राचे थोर समाजसुधारक आणि सामान्य बहुजनांचे उद्धारक होते. बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य हे अनमोल आहे. सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महान समाजसुधारकांचा वारसा महाराष्ट्राला लाभलेला असल्याने राज्यास 'फुले-शाहू-आंबेडकर' यांचा महाराष्ट्र म्हणूनही ओळखले जाते. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी विविध योजना व उपक्रम राबवले. त्यातच त्यांनी मोफत व सक्तीचे शिक्षण, सवर्ण व अस्पृश्यांच्या एकत्रित शाळा, शाळेत गैरहजर राहणाऱ्यास एक रूपया दंड, शिष्यवृत्ती, वसतिगृहे यासारख्या बाबींचा समावेश आहे. शाहू महाराजांनी जात निर्मूलनासाठी केलेले काम ही त्यांच्या विविध योजना व धोरणांमधून स्पष्ट होते. ब्राह्मणेत्तर चळवळ ही त्यांच्याच नेतृत्वाखाली कोल्हापूर संस्थानात सुरू झाली होती. ब्राह्मण वर्गाने महाराजांना वेदोक्त विधी पार पाडण्याचा अधिकार नाकारला. कारण त्यांच्या मते तो अधिकार फक्त ब्राह्मणांना, क्षत्रियांना व वैश्यांना आहे. शूद्रांना पुराणेक्त विधीचा अधिकार आहे. त्यामुळे कोल्हापूरात वेदोक्त प्रकरण निर्माण झाले. ब्राह्मण वर्गाच्या विरोधात ब्राह्मणेत्तर लोक एकत्र आले आणि त्यांचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले. ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर दरी ही आजही समाजात अस्तित्वात आहे. मंत्रोच्चार, पूजा-पाठ ही फक्त त्यांचीच कार्य आहेत असे आजही गृहित धरून आहे. म्हणून समाजात जातीव्यवस्था अजूनही आपले मूळ पक्के धरून आहे. जाती-धर्माच्या नावाखाली अजून काही ठिकाणी दंगली, युद्ध घडून येतात. धर्मग्रंथाचा आधार घेत प्रत्येकजन आपला धर्म श्रेष्ठ असे सांगतो व त्यातून समाजात वेगवेगळे जात समूह व धर्मसमूह अस्तित्वात आले आहेत. त्या सर्वांना एकत्र करण्याचा विचार त्याकाळात शाहू महाराजांनी केला होता, त्याची आजही गरज प्रकर्षाने जाणवते आहे.[1]

**उद्दिष्टे :**

1. शाहू महाराजांचे सामाजिक कार्य अभ्यासणे.
2. शाहू महाराजांच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्याचा आढावा घेणे.

**जीवन परिचय :** राजर्षी शाहू महाराजांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या ठिकाणी 26 जून 1874 ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव घाटगे तर आईचे नाव राधाबाई घाटगे होते. कोल्हापूर संस्थानचे छत्रपती चौथे शिवाजी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई साहेबांनी 1884 मध्ये यशवंतराव यांना दत्तक घेतले व तेव्हा त्यांचे नाव शाहू असे ठेवले. राजर्षी शाहू महाराजांनी 1894 मध्ये कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली व पुढे 1894 ते 1922 पर्यंत 28 वर्षे त्यांनी राज्यकारभार चालवला.[2]

**राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य :** महाराष्ट्रातील एक प्रमुख सुधारक म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे नाव प्रथम घेतल्या जाते. महात्मा फुलेंच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे चालवणारे ते एकमेव राजा होते व त्यांनी फुल्यांचे राहिलेले कार्यही मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजाचे कार्य त्यांनी फुल्यांच्या मृत्यूनंतर पुढे चालवले. 1913 मध्ये त्यांनी सत्यशोधक विद्यालय स्थापन करून एका ब्राह्मणेत्तर व्यक्तीस शिक्षक म्हणून नेमले. सत्यशोधक समाजाबरोबर त्यांनी आर्य समाजालाही नैतिक पाठबळ दिले. 1918 मध्ये त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली. त्याचबरोबर त्यांनी राजाराम महाविद्यालय, ट्रेनिंग कॉलेज, वसतिगृहे, शाळा इत्यादी अनेक योजनाही शिक्षणासाठी राबवल्या.

**1) ब्राह्मणेत्तर चळवळ :** शाहू महाराजांनी त्यांना वेदोक्त विधी नाकारला म्हणून ब्राह्मण लोकांच्या विरोधात ब्राह्मणेत्तर लोक एकत्र करून चळवळी उभी केली व स्वत: त्याचे नेतृत्व केले. जेव्हा त्यांना खात्री झाली की मराठा हे क्षत्रिय आहेत तेव्हा त्यांनी आपल्या राजवाड्यात वैदिक विधी करण्याचा आदेश 1901 मध्ये काढला. तसेच मंदिरामध्ये ब्राह्मणेत्तर पुरोहित नेमले. मराठा समाजातील तरूणांना वैदिक विधी पार पाडण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष पुरोहित शाळा स्थापन केली. अशाप्रकारे त्यांनी कोल्हापूरात ब्राह्मणेत्तर चळवळ सुरू केली.[3]

**2) कनिष्ठ जातीच्या उन्नतीसाठी प्रयत्न :** महाराजांनी खऱ्या अर्थाने बहुजन समाजाला पुढे आणणारे व त्यांचा विकास साधणारे शिक्षण सुरू केले. बहुजनांच्या मनातील उच्चनिच्चतेची भावना नष्ट करण्यासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. म्हणून त्यांनी त्यांच्यासाठी शाळा सुरू केल्या.

**3) कनिष्ठ जातींना आरक्षण :** त्याकाळात फक्त उच्च्वर्णीयांनाच शिक्षणाचा अधिकार होता. त्यामुळे कनिष्ठ जातीच्या लोकांना शिक्षण नसल्यामुळे नोकरीचा प्रश्नच नव्हता. शाहू महाराजांनी ही परिस्थिती जाणली त्यासाठी त्यांनी 26 जुलै 1902 ला एक आदेश समंत करून शासकीय सेवेत ब्राह्मणेत्तर लोकांसाठी 50 टक्के जागा आरक्षित केल्या. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यांना नागरी आणि लष्करी सेवेत घेतले.

**4) कृषीविषयक सुधारणा :** शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी शेतीचा विकास होणे आवश्यक होते. त्यासाठी शाहू महाराजांनी भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधले. शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान मिळण्यासाठी त्यांनी 1912 मध्ये किंग एडवर्ड कृषी संस्था स्थापन केली व शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खेड्यापाड्यात कृषीविषयक यात्रा आणि प्रदर्शने भरवली.

**5) शैक्षणिक कार्य :** शिक्षणामुळेच कनिष्ठ जातींचा विकास होणार याची खात्री त्यांना होती म्हणून त्यांनी त्यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण, वसतिगृह योजना, शिष्यवृत्ती व गैरहजर राहणाऱ्यास दंड याप्रकारे विविध योजना राबवल्या. गावातील मंदिरे, चावड्या या शाळेचे वर्ग म्हणून वापरण्यास परवानगी दिली. 1891-92 मध्ये राजाराम महाविद्यालयात एक वसतिगृह सुरू केले तर 1901 मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस' हे वसतिगृह सुरू केले.[4]

**6) कुलकर्णी वतनाचे निर्मूलन :** गावकारभार पाहण्यासाठी कुलकर्णी या वतनदाराची नेमणूक होती ती पदे अनुवांशिक तत्वाने असल्याने बऱ्याचदा चुकीच्या, अयोग्य, अकार्यक्षम व्यक्ती सुद्धा वतनदार होत असे. त्यामुळे त्यांना असे लक्षात आल्यानंतर त्यांनी ही पदे रद्द केले. वतनदारी ही ग्रामीण समाजातील विकासाचा अडथळा बनत होते. त्यामुळे महाराजांनी कुलकर्णी पद रद्द करून त्याऐवजी तलाठी पद्धती सुरू केली व 1918 ला तसा आदेश काढला अशा प्रकारे त्यांनी वतनदारी पद्धत रद्द करून कनिष्ठ जातीतील लोकांना तलाठी पदावर नियुक्त करण्याचा मार्ग खुला केला.[5]

**अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य :** भारतामध्ये जातीसंस्था ही फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. जातीमधील भेद व त्यातील फायदे-तोटे याचा महाराजांनी बराच अभ्यास केला होता व त्यातून त्यांना लक्षात आले की उच्च जातींना फायदे व कनिष्ठ जातीला वंचितता मिळते यात समानता आणण्यासाठी त्यांनी सर्व स्तरातील मुला-मुलींच्या एकत्र शाळा भरवण्याचे कार्य सुरू केले. जातीच्या आधारे विद्यार्थ्यांचे विभाजन करण्यास बंदी केले. अस्पृश्यांच्या वेगळया शाळा बंद करून एकत्र शाळा सुरू केल्या. कनिष्ठ जातीला बंधनकारक असणारी बलुतेदारी पद्धत 1918 मध्ये बंद केली. सार्वजनिक ठिकाणी जसे नळ, विहिर, धर्मशाळा आणि दवाखाने ही अस्पृश्यांसाठी खुली केली. आंतरजातीय विवाहास मान्यता दिली व त्यासाठी एक कायदाही समंत केला. स्वत:च्या वागण्यातून त्यांनी जातीभेद न पाळण्याचा आदर्श घालून दिला. 1919 मध्ये त्यांनी कोल्हापूर नगरपालिकेचे प्रशासन हे जनतेमधून निवडून आलेल्या प्रतिनिधिंकडे सोपवले. त्यांना असे वाटत होते की सर्व जातीतील सुशिक्षित लोकांच्या हाती सत्ता असावी जेणेकरून सर्वांना समान संधी मिळावी.[6]

अस्पृश्यता नष्ट झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणे शक्य आहे तसेच समाजात विषमता, अन्याय शोषण यासारखे दोष निर्माण झाले आहेत. त्यांचे मूळ जातीभेदात आहे असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते.

**सारांश :**

कोल्हापूर संस्थानचे राजा असूनही शाहू महाराजांनी आपल्या संपूर्ण आयुष्यभर एक समाजसुधारक म्हणून कार्य केले व आपल्या पदाचा योग्य वापर त्यांनी केला. अस्पृश्य, दलित, भटकेविमुक्त, जाती-धर्म समाजातील शोषित वंचित जन यांच्या उद्धारासाठी त्यांनी कष्ट केले व विविध योजना व धोरणे यामाध्यमातून समाजात विकास साधण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत शाहू महाराजांचा सिंहाचा वाटा आहे.

**संदर्भ सूची :**

1 पिंपळा बोराळकर, 1992, 'भारतीय राजकीय विचारवंत', रिया पब्लिकेशन, नागपूर
2 धर्माधिकारी अभ चाणक्य मंडळ, 2004, 'महाराष्ट्रातील समाजसधारक', पुणे
3 टाले प्रफू अशोक, 2018, 'महाराष्ट्रातील समाजसुधारक', साईज्योती पब्लिकेशन, कसारपूरा, नागपूर
4 पवार जयसिंगराव, 2001, 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', कोल्हापूर
5 historicaltauch.com
6 wikipedia
7 https:dgipr: maharastra.gov.in.com